Peer Reviewed Referred and UGC Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
English / Marathi Part - IV

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com




Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I January - March - 2019

English / Marathi Part - IV

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - IV


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर** | १-४ |
| २ | १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शिक्षणाचे आधुनिकीकरण : महात्मा फुले<br>**विनोद राजेंद्र कामडी** | ५-९ |
| ३ | आधुनिक महाराष्ट्रातील सहकार चळवळ : एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. आसाराम हरिभाऊ देसाई** | १०-१३ |
| ४ | ब्राह्मणी राष्ट्रवादी इतिहासलेखन परंपरेच्या कोळीकोष्टात अडकलेले ''शिवचरित्र''<br>**कमलेश सुभाष बेडसे** | १४-२५ |
| ५ | आधुनिक भारतातील शेतकरी चळवळीची पार्श्वभूमी<br>**प्रा. भास्कर टेकाळे** | २६-२८ |
| ६ | महाराष्ट्रातील दलित चळवळीची पार्श्वभूमी<br>**प्रा. सुनिल सुखदेव लोखंडे** | २९-३१ |
| ७ | महाराष्ट्रातील दलित चळवळीची पार्श्वभूमी<br>**प्रा. नागरे एन. व्ही.** | ३२-३८ |
| ८ | महाराष्ट्रातील प्रबोधन आणि आर्य समाज<br>**प्रा. अमोल पोपट बोत्रे** | ३९-४१ |
| ९ | वसाहतकालीन महाराष्ट्रातील आर्थिक संक्रमण<br>**प्रा. सर्जेराव बनसोडे** | ४२-४५ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १. एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेचा चिकित्सक अभ्यास

**प्रा. ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर**

सहा. प्राध्यापक, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

### प्रस्तावना

शिक्षण म्हणजे वाघीणीचे दूध हे आज म्हटले जात असले तरी शिक्षणाची खरी सुरवात एकोणिसाव्या शतकात झाली. म्हणजे त्या अगोदर महाराष्ट्रात शिक्षण दिले जात नव्हते असे नाही. अगदी प्राचीन काळापासून शिक्षण दिले जाते. परंतु शिक्षण देण्याचा व शिक्षण घेण्याचा हक्क हा केवळ एका विशिष्ठ वर्गाकडेच होता. शिक्षण ही त्या राजाचा किंवा राज्याची जबाबदारीच नाही अशी मानसीकता त्या राज्य कर्त्यांची निमार्ण झालेली होती. उच्च वर्गीय लोक राजघराण्यातील लोंक व ब्राम्हण वर्ग यांचाच अधिकार शिक्षणावर निर्माण झालेला होता. शिक्षण हे प्रामुख्याने पारंपारिक व धार्मिक स्वरूपाचे दिले जात होते. त्यामध्ये वेद, पुराण, ज्योतीश, अलंकार, व्याकरण यांचा समावेष होता. विशेष म्हणजे धार्मिक म्हंटले की त्या काळात त्याच्या संबंधीत वर्ग म्हणजे ब्राम्हण, पुरोहीत वर्ग हा होय विज्ञान व आधुनिकतेच्या भुमिकेतुन शिक्षण देण्याचा मोठा अभाव या काळात पहायला मिळतो.

इंग्रज अगोदर शिक्षण संस्थांचा जर विचार केला तर महाराष्ट्रात शिक्षण देण्यासाठी कोणत्याही शाळा व महाविदयालय नव्हती. गावातील मंदीर चावडी मश्जिद या ठिकाणी शाळा भरत भारताला महाराष्ट्राला आधुनिक शिक्षणाची पाश्चात्य शिक्षणाची खरी ओळख ही ब्रिटीशांनाच करून दिली आणि परिणामी भारतीय लोकांनी आधुनिक शिक्षण घेण्यास सुरूवात केल्याने या ठिकाणी वेगवेगळया राष्ट्रीय व सरकारी शिक्षण संस्थाना उदय झाला व त्यामुळे जगाची खरी ओळख शिक्षणामुळेचच भारतीयांना झाली.

### संशोधनाची उदिदृष्टये

१. महाराष्ट्रातील ब्रिटिश कालीन शिक्षण संस्थाचा अभ्यास करणे
२. महाराष्ट्रातील पाश्चात्य शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास करणे
३. एकोणिसाव्या शतकातील शिक्षणाच्या क्षेत्रात झालेल्या सुधारणांचा आढावा घेणे
४. महाराष्ट्रातील राष्ट्रीय शिक्षण संस्थाचा अभ्यास करणे.
५. शिक्षण क्षेत्रात समाज सुधारकांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.
६. एल्फिन्स्टनच्या शैक्षणिक सुधारणांचा अभ्यास करणे.

### संशोधन पद्धती

सदर शोधनिबंधासाठी प्राथमिक तसेच दुयम साधनाचा वापर केला असुन त्यामध्ये ऐतिहासिक संशोधन प्रणाली वापरली आहे.

**संशोधनाच्या मर्यादा**

सदर शोधनिबंधाचा कालखंड हा कवेळ १९ वे शतका पुरताच मर्यादित आहे.

**ब्रिटीशांचे शिक्षण विषयक धोरण**

ब्रिटिश भारतात आले व्यापाराच्या उद्देशाने व बनले राज्यकर्ते एका व्यापारी कंपनीने भारतावर राज्य केले राज्यकरताना त्यांना आवश्यक होता सुशिक्षित नोकरवर्ग त्यातुनच त्यांनी भारतात सुरूवात केलीती म्हणजे शिक्षण व्यवस्थेची भारतामध्ये ब्रिटीशांनी शिक्षणाच्या बाबतीत तरतुद केली ती म्हणजे १८१३ च्या चार्टर अॅक्टने या अॅक्टमध्ये भारतीय शिक्षणासाठी पहिल्यांदाच १ लाख रूपये शिक्षणासाठी दिले गेले होते. व शिक्षणाची मुहर्तमेढ रोवली गेली.

**भारतीय शिक्षणासंबधी मतप्रवाह**

भारतीयांना शिक्षण दयायचे पण कोणते यावरून दोन गट निर्माण झाले. एक गट म्हणजे प्राच्यवादी तर दुसरा गट पाश्चात्यवादी भारतीयांना शिक्षण भारतीय भाषेतून दयावे याचे समर्थक होते. विल्सन आणि प्रिन्सेप तर इंग्रजी भाषेचा पुरस्कार करणारे तर सर थॉमस मन्रो व एलफिन्स्टन हे होते. मेकॉले ही या याच मताचा होता. शेवटी १ मार्च १८३५ ला बेटिंकच्या सरकारने इंग्रजी भाषेचा पुरस्कार केला. इंग्रजी भाषेतून शिक्षण देणा–या संस्थाना अनुदान दयावे असे ठरले.

**मुबंई प्रांतात एल्फिन्स्टनचे शैक्षणीक कार्य**

१८१८ पेशवाईचा शेवट झाल्यानंतर मुबंई प्रांतात गव्हर्नर म्हणुन आलेल्या एल्फिन्स्टीनने शिक्षण सुधारणेच्या बाबतीत महत्वाचे योगदान दिले धर्म, आणि शिक्षण यांच्यात दरी पाहिजे या मताचा एल्फिन्स्टन होता. एल्फिन्स्टन ने १८२३ साली एक शिक्षण विषयक योजना तयार केली त्यानुसार स्थानिक शाळातील शिक्षण पध्दतोस सुधारणा करावी शाळाच्या संस्थेत वाढ करावी शिक्षणासाठी, पुस्तके पुरवावीत, कनिष्ठ समाजामध्ये शिक्षणाचा प्रचार प्रसार करावा, युरोपियन ज्ञान घेण्याची इच्छा असणा–यासाठी विशेष पाठशाला सुरू करणे. आपल्या योजना कार्यान्वीत करण्यासाठी १८२० साली "सोसायटी फॉर द प्रोमेशन ऑफ द एज्युकेशन ऑफ पुअर" नावाची संस्था सुरू केली मुबंई येथे १८२४ साली इंजीनियरिग कॉलेजची सुरूवात करून अभियांत्रीक शिक्षणाचा पाया घातला इ.स. १८१६ मध्ये "बॉम्बे एज्युकेशन सोयायटीची स्थापना" केली कंपनी तर्फे या संस्थेने ठाणे, भडोच, मुंबई या ठिकाणी शाळा सुरू केल्या. भारतीय भाषेत ग्रंथ निर्माण करणे शिक्षणासाठी निधी जमा करणे यासाठी १८२० साली " द बॉम्बे नेरिव्ह अॅड स्कुल बुक सोसायटीची" स्थापना केली. पुण्यात पेशव्याची सत्ता हातात घेतल्यांनंतर ब्राम्हणाचा विरोध टाळण्यासाठी एल्फिन्स्टनने १८२१ ला संस्कृत कॉलेजची स्थापना केली त्यांचेच नामातंर पुढे पुना कॉलेज झाले. नंतर त्यात विभाजन होउन १९६१ साली डेक्कन कॉलेज झाले व व्हर्नाक्युलर कॉलेज निमार्ण झाले महाराष्ट्राच्या शिक्षणात प्रसारामध्ये एकत्रीतपणा आणण्यासाठी १८४० साली शिक्षण मंडळाची स्थापना केली याच शिक्षण मंडळाने महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा प्रसार केला १८४८ साली मुंबई इलाख्यात २१६ या मंडळाच्या अंतर्गत सुरू होत्या व त्यामध्ये जवळ–जवळ १२००० विदयार्थी शिक्षण घेत होते. वैदयकीय शिक्षणाची सुरूवात करून मुंबई येथे १८४५ साली सर गॅबर्ट ग्रँट वैदयकीय महाविदयालयाची सुरूवात केली एकंदरीत मुंबई इलाख्यात

...च्या प्रसारात एल्फिन्स्टने महत्वाची भुमिका बजावली . एकोणीसाव्या शतकात मुंबईत शैक्षणीक ... याच्यात कालखंडात मोठया प्रमाणात घडुन आल्या.

## ...च्या शिक्षण विषयक खलिता

सर अलेकझांडर डफ, सर चार्ल्स, ट्रँव्हेलियन आणि जॉर्ज मार्शमेन यांच्या समितीमार्फत देशी आणि ... शिक्षणाची नौकशी केली. त्याकाळाचे कंपन्याच्या बोर्ड ऑफ कंट्रोलचे अध्यक्ष सर चार्ल्स वुड यांनी ... समितीच्या अहवालानुसार एक शिक्षक विषयक योजना तयार केली व कंपनीचे गव्हर्नर डलहौसीकडे ही ... १९ जुलै १९५४ मध्ये सादर केली. या योजनेनुसार भारतातील प्राथमिक शिक्षणास उत्तेजन देण्यात ... खाजगी शाळांना अनुदान माध्यमिक शिक्षणापर्यतचे शिक्षण मातृभाषेतुन देण्याते यावे, उच्च, शिक्षण ...तून असावे. सरकारने स्त्रियांना शिक्षणास प्रोत्साहन दयावे, लंडन विदयापिठाच्या धतरीवरती मुंबई, ... कोलकता . येथे विदयापिठाची स्थापना करावी शाळाच्या तपासणीसाठी प्रत्येक प्रांतात स्वतंत्र विभाग ... करण्यात यावा शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण शाळा असाव्यात.

वुडच्या शिक्षण विषयक खलीत्याच्या विचार केल्यास भारतात आधुनिक शिक्षणाच्या प्रसार प्रचाराचा ... म्हणण्यास हरकत नाही. भारतीयांना इंग्रजी भाषा समजने अवघड होती. एक परकीय भाषा होती ... तेच वुडने ओळखुन स्थानिक भाषेचा पुरस्कार केला विदयापीठाची शिफारस योजनेत केली गेल्याने ... सर्वप्रथम मुंबई येथे पहिले विदयापीठ स्थापन झाले. खाजगी शाळांना अनुदान देण्याच्या ...मुळे नंतरच्या काळात अनेक खाजगी शाळाची निर्मीती झाली. परीणामी भारतात, महाराष्ट्रात मोठया ... शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार झाला.

## भारतातील पहीला शिक्षण आयोग

भारतात शिक्षणाच्या बाबतीत सुधारणा होण्यासाठी वुडच्या खालित्या नंतर महत्वाचा अहवाल सादर ... तो म्हणजे हंटर आयोगाने हंटर आयोगाला भारतातील शिक्षणाचा पहीला आयोग म्हणून ओळखतात. ... शिक्षणासंबधी वेगवेगळे अयोग आले. परंतू प्राथमिक शिक्षणा बाबतीत महत्वाच्या शिफारशी या आयोगाने केलया. हंटर आयोगाने ज्या २३ शिफारशी केल्या. यातून प्राथमिक शिक्षणाला चालना मिळाली. ... शिक्षण, मुस्लिम शिक्षण यांच्याकडे विशेष लक्ष दिले गेले. खाजगी शिक्षण संस्थाना अनुदान मिळाल्याने खाजगी शिक्षण संस्थांचा उदय झाला. त्यातून हजारो विदयार्थी शिक्षण घेवू लागले. यातून शिक्षण घेवून व ... खितपत पडलेल्या लोकांना जगाची ओळख झाली.

## मुंबई इलाख्यात शिक्षणासंबधी जगन्नाथ शंकर सेठ यांचे कार्य

एकोणिसाव्या शतकात प्रबोधनाची जी चळवळ सुरू झाली त्या चळवळीमध्ये शिक्षणासंबंधी कार्य ... महाराष्ट्रातील अग्रगण्य असे नेतृत्व म्हणजे जगन्नाथ शंकर सेठ हे होय. १८५७ ला स्थापनझालेल्या मुंबई विदयापिठाचे पहीले फेलो जगन्नाथ शंकर सेठ हे होते. मंबई प्रांतात एलफिन्स्टनने केलेलया शैक्षणिक ...मध्ये जगन्नाथ शंकर सेठ यांच्या महत्वाचा वाटा होता. महाराष्ट्रीयन लोकांना शिक्षण घेता यावे यासाठी ... केवळ सरकारवरती अवलंबून राहिले नाही तर त्यासाठी त्यांनी "बॉम्बे एज्युकेशन सोसायटी" स्थापणा ... या संस्थेने मुंबईतच नव्हे तर मुंबई बाहेर देखील शिक्षणाने कार्य केले १८४२ मध्ये नानांनी एल्फिन्स्टन ...कुलची स्थापना केली याच हायस्कूलचे रूपांतर पुढे एल्फिन्स्टन महाविदयालयात झाले जगन्नाथ शंकर

सेठ यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी देखील विशेष प्रयत्न केले. मुंबई इलाख्यात शिक्षणाचा प्रसार खुप नानांनी केला.

**निष्कर्ष**

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्विच्या महाराष्ट्राचा जर विचार केला तर महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार झालेला नव्हता जे काही शिक्षण दिले जायचे ते म्हणजे धार्मिक स्वरूपाचे होते. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात महत्वाची प्रगती झाली. ब्रिटशांनी भारतात इंग्रजी भाषेतून शिक्षण देण्यास सुरूवात केली. त्याच बरोबर स्थानिक भाषेतून शिक्षण देण्याची सुविधा निर्माण केली. अभ्यासक्रमात विज्ञान, गणित, यासारख्या विषयांचा समावेश केल्याने महाराष्ट्राला जगाची ओळख झाली. महाराष्ट्रातील मुंबई इलाख्याचा विचार करता या भागात शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्यात वेगवेगळया शिक्षण संस्था सुरू करण्यात मुंबई प्रांताचा गव्हर्नर एल्फिन्स्टन व जगन्नाथ शंकर सेठ उर्फ नाना यांनी महत्वाची भुमिका बजावली व्यापाराच्या उद्देशाने भारतात आलेल्या ब्रिटीशांना राजकीय सत्ता हातात घेतल्यानंतर त्यांना आवश्यक असणा-या नोकरवर्गासाठी शिक्षणाची सुरवात भारतात केली.

**संदर्भ साधने / तळटिपा**

१. डॉ. बी.एल ग्रोवर, डॉ. एन.के.बेल्हेकर : आधुनिक भारताचा इतिहास —एस. चंद पब्लिकेशन्स नवी दिल्ली, २०१७

२. डॉ. अनिल कठारे : आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास — विद्या बुक्स पब्लिशर्स

३. डॉ गणेश शेटकर, डॉ शारदा शेवतेकर, डॉ. शोभना जोशी : आधुनिक भारताचा इतिहास मृणाली प्रकाशन

४. मुळ लेखक— हुकमचंद जैन अनुवाद — प्रा. म.न.मार्डीकर :आधुनिक भारताचा इतिहास के सागर पब्लिकेशन्स

५. डॉ. एस. एस. गाठाळ : आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, जुलै २०१८.

६. मानिक लाल गुप्ता — : आधुनिक भारत का इतिहास साहित्य रत्नालय कानपूर